नवी मुंबई महानगरपालिका

**Navi Mumbai Municipal Corporation**

पहिला माळा, बेलापूर भवन, सी.बी.डी.,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्र. : २७५७ ७० ७०
२७५७ ५७ ००
फॅक्स : २७५७ ३७ ८५

1ST. FLOOR, BELAPUR BHAVAN, C.B.D.,
NAVI MUMBAI - 400 614.
TEL. No. : 2757 70 70
2757 57 00
FAX : 2757 37 85

जा.क्र./नमुंमपा/नरवि/बा.प./प्र. क्र. ए -७०४३/2962/२००७
दिनांक :-25 /06/२००७

प्रति,
श्री. सी. वाय. थोरात
इमारत क्र. एलआयजी/३७/१२, सेक्टर १०, नेरुळ,
नवी मुंबई.

नस्ती क्र.-नमुंमपा/वि.प्र.क्र.- ६४०/२००७ प्र. क्र. ए - ७०४३
विषय :-इमारत क्र. एलआयजी/३७/१२, सेक्टर १०, नेरुळ, या जागेत निवासी या कारणासाठी वाढीव बांधकाम परवानगी देणेबाबत.
संदर्भ :- आपले वास्तुविशारद यांचे दि. ११/०५/२००७रोजीचा अर्ज.

महोदय,

इमारत क्र. एलआयजी/३७/१२, सेक्टर १०, नेरुळ, नवी मुंबई येथे निवासी या कारणासाठी वाढीव बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन भुखंडावरील जागेत निवासी उपयोगासाठी वाढीव बांधकाम परवानगी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५(१)(३) मधील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येत आहे. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र सोबत नियोजित बांधकामासाठी जोडीत आहे. तसेच खाली नमुद केलेल्या बाबींची नोंद घ्यावी.

पाणी पुरवठा व मलनि:सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर आढळुन आल्यास आपणास रितसर दंड भरावा लागेल. तसेच बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुद्धा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे/सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक/भुखंडधारक/गाळेधारक यांची राहील. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांवर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भुखंड सखल भागामध्ये असल्यास जमिनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमिनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा उंचावर असली पाहीजे. सांडपाणी, पावसाळ्याचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भुखंडामध्ये पाणी साचणार नाही. अशी भुखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणेच करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारित बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजूर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील याची कृपया नोंद घ्यावी.

ईमारतीचे बांधकाम करणारे मजूरांचे निवासाकरीता (Labour Shed) भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे तात्पूरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजूचे सामासिक अंतरात ३.०० मी. रुंदीचे तात्पूरती शेड्स टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढून टाकणेत यावी.

कृ.मा.प.



REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA
2024/6/14 13:48